# ‘एन.एस.एस.चे ऑनलाईन शिबिर प्रेरणादायी : साळुंखे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी आयोजित केलेले ऑनलाईन शिबिर कोविडच्या काळात खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक या शिबिराच्या माध्यमातून एक नवी ऊर्जा घेऊन सेवाभावी भूमिकेतून समाजाच्या सेवेस सज्ज होतील, असा विश्वास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी येथे व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते. यूट्यूबच्या माध्यमातून महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवक-स्वयंसेविका शिबिरात सहभागी झाले.

स्वयंसेवकांशी ऑनलाईन संवाद साधताना प्राचार्य साळुंखे म्हणाले, ‘प्रेरणा शिबिरातून व्यक्तिमत्व विकासबरोबर नवे नेतृत्व उभे राहणार आहे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नक्कीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. राष्ट्रीय सेवा योजना ऑनलाईन प्रेरणा शिबिर हा एक अभिनव प्रयोग असून, सद्यस्थितीतच नव्हे, तर या पुढील काळातही दिशादर्शक ठरेल.’

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांनी कोविडच्या संकटकाळात एन.एस.एस.च्या स्वयंसेवक-स्वयंसेविका यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. उच्च व तंत्रज्ञान विभागाचे राज्य समन्वयक डॉ. अतुल साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, युनिसेफच्या पदाधिकारी स्वाती मोहपात्रा यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक अभय जायभाये यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील एनएसएस संचालक, जिल्हा समन्वयक, कार्यक्रम अधिकारी झूम व यूट्यूबच्या माध्यमातून ऑनलाईन उपस्थित होते.

# 'शिवराज'च्या १९ विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज :** येथील शिवराज महाविद्यालयाचे १९ विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे मानकरी ठरले आहेत. स्वीटी बार्देस्कर, प्रथमेश काकडे, चिन्मय तेली, निकिता गोरुले, वैभव लोखंडे, आकाश वाजंत्री, कावेरी पाटील, अंकिता दळवी, सुशांत मालेकर या विद्यार्थ्यांनी दहा हजार रुपयांची शिष्यवृत्ती पटकावली आहे. सूरज खोराटे, सेबेस्टीना बारदेस्कर, तृप्ती पाटील, केतन मंडले, पंकज चौगुले, कोमल घेवडे, आज्ञा मगदूम, संयोगिता रावण, तेजस्विनी शिंदे, सुस्मिता दुंडगे या विद्यार्थ्यांनी पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती पटकावली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांचे प्रोत्साहन तर प्राचार्य बी. जे. देसाई, संस्थेचे सचिव प्रा.अनिल कुराडे, रजिस्ट्रार संतोष शहापूरकर व सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# दत्तक योजनेतून ग्रीन कॅम्पसला बळ

## पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा पुढाकार; विद्यार्थ्यांवर संगोपनाची जबाबदारी

**सकाळ वृत्तसेवा**

**आर. के. नगर, ता. १२ : पर्यावरणशास्त्र विभागाने वृक्ष दत्तक योजना सुरू केली. यात सामाजिक संस्था या विभागाकडे रोपे देतात. त्यानंतर त्या रोपांची लागवड आणि त्यांचे संगोपन ही सर्व जबाबदारी पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी घेतात. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या आवारात सुमारे ३५० झाडे या योजनेतून लावली आणि जगवली आहेत. परिणामी, शिवाजी विद्यापीठाचे वैशिष्ट्य असणाऱ्या ग्रीन कॅम्पस उपक्रमाला पाठबळ मिळाले आहे.**

पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, याचेही मूल्यमापन नॅक समितीकडून केले जाते. त्यावर विद्यापीठाला गुण दिले जातात. याला ग्रीन कॅम्पस असे म्हणतात. शिवाजी विद्यापीठाने ग्रीन कॅम्पस अंतर्गत पथदर्शी काम केले. गुण, परीक्षण याच्याही पलीकडे जाऊन विद्यापीठाने परिसरातील जैवविविधता जपली आहे. पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे यातील योगदान उल्लेखनीय आहे. या अधिविभागाने वृक्ष दत्तक योजना राबवली. या अंतर्गत जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, व्यक्ती यांनी विभागाकडे रोपे दिली. विद्यार्थ्यांनी त्याची लागवड करून त्यांचे संगोपन केले. यातून या परिसरात सुमारे ३५० झाडे लावून जगवली. झाडांना पाणी देणे, आळी करणे, खते देणे या कामात विद्यार्थी मदत करतात. एम.एस्‌सी.च्या दोन्ही वर्षांतील विद्यार्थ्यांना हे काम दिले आहे. बहुतांश झाडेही देशी आहेत. यामुळे ग्रीन कॅम्पस या योजनेला पाठबळ मिळाले आहे.



### ग्रीन कॅम्पस अंतर्गत उपक्रम

- स्वयंपूर्ण रोपवाटिका
- मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड
- जलसंधारणातून जलस्वयंपूर्णता
- घनकचरा व्यवस्थापन
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प
- किचन वेस्टपासून गॅसनिर्मिती



**वृक्ष लागवडीबरोबरच त्यांचे संगोपन करून ती जगविणेही तितकेच महत्त्वाचे असते. त्यामुळे पर्यावरणशास्त्र अधिविभागाने दत्तक योजना सुरू केली. संस्थांनी दत्तक घेतलेल्या रोपांचे संगोपन विद्यार्थी करतात. यात एम.एस्सी.च्या दोन्ही वर्षांतील विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी असून, विद्यार्थीही मोठ्या उत्साहाने संगोपनाचे काम करतात.**

**- पी. डी. राऊत**, विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र अधिविभाग

# राष्ट्रीय सेवा योजनेतून नेतृत्वगुणांचा विकास करा

## राज्यस्तरीय शिबिरात पोपटराव पवार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजविकास आणि राजकारण याचा मेळ घालून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून नेतृत्व गुणांचा विकास करा, असा मंत्र हिवरे बाजारचे माजी सरपंच, पद्‌मश्री पोपटराव पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिरात ते 'लोकसहभागातून ग्रामविकास' या विषयावर बोलत होते. 'नॉट मी बट यू' या विषयावर इंद्रजित देशमुख यांनी मार्गदर्शन केले. समाज परिवर्तनाची सुरुवात स्वत:पासून विद्यार्थ्यांनी



करावी, असा मौलिक सल्ला दिला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्राचे संचालक डॉ. डी. के.गायकवाड, प्रा. दीपक पाटील यांनी मार्गदर्शन केले.

स्वागत-प्रास्ताविक डॉ. उर्मिला क्षीरसागर, गोरखनाथ किरदत्त यांनी केले. यावेळी प्रा. अभय जायभाये, प्रा. तानाजी पाटील, प्रा. स्नेहल राजहंस, प्रा. डी. जी. चिखलीकर यांनी सहभाग घेतला.